निशाणी क्र. २२

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०४ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – लक्ष्मण शिवाजी जाधव

वय – ४५ वर्षे, व्यवसाय– नौकरी,

पत्ता – पुष्पराज नगर निलंगा ता. निलंगा जि. लातूर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

१. दिनांक १०.०४.२०२६ रोजी पोलिसांनी मला नामदेव काळे यांच्या घरी पंचनामासाठी बोलावले होते. माझे घर नामदेव काळे यांच्या घराशेजारी आहे. त्यावेळी माझ्यासोबत नामदेव काळे, महादेव वडगीरे आणि सोळंके नावाचे पोलिस होते. तो पंचनामा नामदेव काळे यांच्या घरातील बेडरूमचा होता. तो पंचनामा माझ्या समक्ष पोलिसांनी केला होता. घटना ठिकाणी कपाटामध्ये रिकामा डबा होता. पोलिसांनी त्या वस्तुस्थितीप्रमाणे पंचनामा लिहीला. मी त्या पंचनाम्यावर सही केली होती. [आत्ता मला प्रस्तूत कामातील दि.१०.०४.२०२६ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला.] त्यावरील सही माझी आहे. ती मी ओळखतो. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २३** देण्यात आले.

**उलटतपास आरोपीतर्फे अॅड. के.एन. पवार यांच्यामार्फत शपथेवर सुरु–**

२. मी पंचनामा चालु होता तेंव्हा फिर्यादीच्या घरात १०० मी. अंतराम थांबलो होतो. पंचनामा ४ पानाचा होता. फिर्यादीच्या घरापर्यंत चालत जाण्यासाठी २० मि. अवधी

लागतो. फिर्यादीच्या घराच्या पुर्वेला रस्ता, पश्चिमेस खुली जागा, उत्तरेस खुली जागा व दक्षिण बाजुस खुली जागा आहे. पंचनामा किती तारखेला झाला ते मला आठवत नाही पंचनामा सायंकाळी ६.०० च्या दरम्यान चालु झाला. तो पंचनामा ६.४५ वा पर्यंत चालु होता. आमच्याशिवाय तेथे दोन पोलिस अधिकारी होते. पोलिसांनी घटना ठिकाणावरून कोणत्याही वस्तु जप्त केल्या नाहीत. फिर्यादीच्या घराच्या सभोवताली पोलिसांनी संरक्षण बॅरीकेट्स लावले नव्हते. फिर्यादी माझा मित्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर खोटा आहे. पोलिसांनी घटनास्थळ पंचानाम्याचा व्हीडीओ केला होता का हे मला माहिती नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

GUNJAVATE APARNA SHIVAJI

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक २१/०७/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा